महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

ई-मेल vishi4-hted@mah.gov.in

संकीर्ण-२०२१/प्र.क्र.५६/विशि-४ दिनांक:-१० ऑक्टोबर, २०२२.

प्रति,
कुलसचिव,
अमिटी विद्यापीठ,
मुंबई-पुणे एक्सप्रेस वे,
भातन, पो. सोमटने
पनवेल-४१० २०६.

**विषय: स्वयं अर्थसहाय्यित अमिटी विद्यापीठ, पनवेल विद्यापीठ अधिनियमातील कलम ३० अन्वये पहिले परिनियमास मान्यता देण्याबाबत.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपण विद्यापीठाच्या अधिनियमातील कलम ३० अन्वये पहिले परिनियम शासन मान्यतेसाठी सादर केले होते.

आपणास कळविण्यात येते की, आपण सादर केलेल्या परिनियमांची शासनाने तपासणी करून सदर परिनियमांमध्ये आवश्यक त्या ठिकाणी बदल करून परिनियमांत एकसुत्रता आणलेली आहे. विद्यापीठाच्या पहिल्या परिनियमास शासन मान्यता प्रदान करून ते महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक २८ सप्टेबर, २०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. त्याची प्रत सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. पहिले परिनियम विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून व अन्य विहित पध्दतीने प्रकाशित करावेत व शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार विद्यापीठाने कामकाज करावे. या परिनियमातील तरतुदीनुसार आपण विद्यापीठाचे कामकाज करत नसल्याची तक्रार प्राप्त झाल्यास विद्यापीठ अधिनियमातील तरतुदीचे उल्लंघन झाल्याचे समजून आपल्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सोबत- पहिले परिनियम.

(अजित काटकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.